# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

**डॉ. ए. एस. चंद्रमौली**
वित्त व लेखा अधिकारी (प्र.)
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०६

संकेतस्थळ : www.unigug.org
ई.मेल : faogug@gmail.com
फॅक्स क्र. : ०७१३२-२२३१०६


जा.क्र. /गो.वि./वि.ले.वि./४३० /२०२३ दिनांक - १९/ ०५ /२०२३

## दरपत्रक सुचना क्र. २४५/२०२३ (पाचवी वेळ)

### विषय- उपकरण/साहित्यांवर नंबरींग करण्यासाठी स्थानिक पेंटरसह वार्षीक दरकरार

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारे भांडार विभाग तसेच विविध विभागाअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या उपकरण/साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्यासाठी गडचिरोली स्थित स्थानिक पेंटर यांचेकडून खालील अटि व शर्तींच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-अ"** मध्ये दर मागविण्यात येत आहेत.

आपण आपले दर भरून दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा **दि.०५/०६/२०२३** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुख्य आवक जावक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त होणारे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत. दरपत्रके स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे.

**अटि व शर्ती :**

१) सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-अ"** मध्ये आपण आपले दर "प्रती नोंद करीता" भरून सादर करावे. (उदा. नोंद/नंबरींगचा नमुणा पुढील प्रमाणे राहिल **GU/FAO/CUB/2018-19/21)**

२) उदाहरनार्थ दर्शविल्याप्रमाणे नोंदी/नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्यासाठी दर मागविण्यात येत असून निवीदाकाराने दर सर्व कर समावेशक सादर करावे.)

३) विद्यापीठाने आदेशीत केल्यानुसार नंबरींग करून देणे बंधनकारक आहे. उदाहरणामध्ये दर्शविलेल्या शब्दांपेक्षा कमी-अधिक शब्दांचा/संख्येचा वापर नंबरींगमध्ये होवू शकतो. तथापी विद्यापीठाने मंजूर केलेले दर (प्रती नोंद प्रमाणेच) विद्यापीठास देय राहिल.

४) नोंद घेण्याकरीता पेंटरला स्वतःचे ब्रश व पेंट वापरावयाचे आहे. विद्यापीठ कोणतेही साहित्य पेंटरला पुरविणार नाही.

५) विद्यापीठाने पत्रान्वये/दुरध्वनीवरून आदेशीत केल्यानुसार विद्यापीठामध्ये स्वखर्चाने उपस्थित राहून नंबरींग करावे लागेल.

६) मंजुर झालेल्या दराचा कालावधी हा एक वर्षाचा राहिल. मंजुर दरानेच वर्षभर कार्य करणे बंधनकारक राहिल.

७) दर सर्व करासहित असावेत, अटिबद्ध असलेले दर स्विकारले जाणार नाही. दर अचुक सुस्पष्ट असावेत.

८) दरपत्रकाच्या बंद लिफाफ्यावर **" साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्याबाबत निवीदा"** असे शिर्ष स्पष्ट नमूद करावे.

९) वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नावे दरपत्रक सादर करावे.

१०) गोंडवाना विद्यापीठ प्रशासनाने निवीदा मान्य किंवा रद्द करण्याचा अधिकार स्वतःकडे राखुन ठेवलेला आहे.

११) दरकरार करण्यात येणाऱ्या धारकाकडून होणाऱ्या कार्याच्या देयकाचे शोधन हे त्रैमासीक करण्यात येईल.

१२) आदेशित केल्यानुसार विहित मुदतीत पेंटीगची कामे करून न दिल्यास शासन खरेदी नियमपुस्तीकेनुसार दंड आकारून दंडाची रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल.

१३) देयकातुन शासन नियमाप्रमाणे सर्व कर कपात करून देयक रक्कम अदा करण्यात येईल.

१४) निविदाधारकाने आधार कार्ड अथवा पॅन कार्ड सोबत जोडने अनिवार्य आहे.

**डॉ. ए. एस. चंद्रमौली**
वित्त व लेखा अधिकारी,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**"प्रपत्र-अ"**

प्रति,

मा. वित्त व लेखा अधिकारी,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :- उपकरण/साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्याबाबत निवीदा..**

संदर्भ :- जा.क्र. /गो.वि./वि.ले.वि./ /२०२३, दिनांक :- /०५/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत केलेली संदर्भांकित दरपत्रक सुचनेच्या अनुषंगाने अटि व शर्तीस आधिन राहुन खालील नमुद दराने **साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्यासाठी** दर सादर करीत आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **दर प्रती नोंद**<br>**(सर्व कर, साहित्य व मणुष्यबळाासह)** |
|---|---|---|
| १ | **GU/FAO/STORE/DSR-05,20/13-2023**<br>(उपरोक्त नंबरींग केवळ उदाहरनार्थ असून त्यातील संख्या/शब्द कमी अधिक होवू शकतात) | |

निवीदा सुचनेतील अटि व शर्तीच्या आधिन राहुन उपरोक्त तपशिलात नमुद नुसार साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्यासाठी दरपत्रकात दर भरून सादर करीत आहे. कृपया स्वीकृत करावे.

निवीदाकाराची सही ------------------------------------------------------------

स्वाक्षरीकर्त्यांचे नाव ------------------------------------------------------------

फर्म/निवीदा दर कर्ता / सार्थाचे /अधिकृत पुरवठादाराचे नाव -----------------------------------

(रबरी शिक्का)